पेन्शनधारकांना लवकरच दिलासा, रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांचे आश्वासन

e Paper



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in बुधवार दिनांक 06/08/2025 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 173 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# पाच वर्षात 1.25 लाख उद्योजक घडणार

## मंत्रिमंडळात निर्णय



>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नाविन्यता धोरण, २०२५ ला झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणामुळे राज्यात येत्या पाच वर्षात १.२५ लाख उद्योजक घडतील आणि ५० हजार स्टार्टअप्स् सुरू होतील असे नियोजन आहे. यामुळे देशातील सर्वाधिक यामुळे राज्यात स्टार्टअप आणि युनिकॉर्न्स राज्यात स्थापन होण्याबरोबरच रोजगार निर्मिती आणि नाविन्यता क्षेत्रात राज्याची जागतिक स्तरावर ओळख निर्माण होईल. यात शहरी व ग्रामीण भागांतील तसेच महिलांच्या आणि युवकांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअप्सना विशेष प्रोत्साहन दिले जाईल.

महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक स्टार्टअप उद्योग आहेत. ३१ मे, २०२५पर्यंत राज्यातील स्टार्टअप उद्योगांची संख्या २९ हजार १४७ आहे. देशाच्या एकूण स्टार्टअपच्या संख्येत १८ टक्के स्टार्टअप महाराष्ट्रात आहेत. स्टार्टअप उद्योगांना अधिक प्रभावी परिसंस्था तयार करण्यासाठी कालसुसंगत नवीन धोरण आखण्यात आले आहे. या धोरणात नवोपक्रम, उद्योजक, गुंतवणुकदार यांच्यासाठी प्रभावी इकोसिस्टम विकसित करण्यावर भर देण्यात आला आहे. या धोरणातील एक महत्त्वपूर्ण बाब म्हणजे मुख्यमंत्र्यांचा "महा-फंड", ज्यामध्ये ५०० कोटी रुपयांचा निधी असून, यामार्फत सुरुवातीच्या टप्प्यातील २५ हजार उद्योजकांना मार्गदर्शन, इन्क्युबेशन आणि आर्थिक मदत दिली जाणार आहे.

सुव्यवस्थित पायाभूत सुविधांसाठी राज्यभर ITI, पॉलिटेक्निक व शैक्षणिक संस्थांमध्ये मायक्रो इन्क्युबेटर उभारले जातील. तसेच, प्रत्येक प्रशासकीय विभागात प्रादेशिक नवप्रवर्तन आणि उद्योजकता हब्स स्थापन करण्यात येतील. हे हब AI, डीपटेक, फिनटेक, मेडटेक, सायबर सुरक्षा आणि शाश्वतता यांसारख्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रीत करतील. "महाराष्ट्र इनोव्हेशन सिटी' या ३०० एकरावरील नगरीत स्टार्टअप्स, कॉर्पोरेट, शैक्षणिक संस्था आणि सरकार यांना एकत्र आणले जाईल. ही इनोव्हेशन सिटी संशोधन व नवप्रवर्तनाचा केंद्रबिंदू असेल.

महाराष्ट्र स्टार्टअप वीकअंतर्गत निवडलेले स्टार्टअप्स थेट शासन विभागांसोबत काम करू शकतील आणि त्यांना २५ लाखांपर्यंतच्या पायलट वर्क ऑर्डर्स दिल्या जातील. तसेच, पेटंट नोंदणी, उत्पादन गुणवत्ता प्रमाणपत्रे, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये सहभाग यासाठी आर्थिक भरपाई दिली जाईल. तसेच सार्वजनिक संस्था व इतर विश्वासार्ह ग्राहकांकडून वर्क ऑर्डर्स प्राप्त झालेल्या स्टार्टअप्सना कर्ज सहाय्यासाठी खास यंत्रणा निर्माण केली जाईल.

राज्यातील प्रत्येक विभागाने आपल्या वार्षिक निधीपैकी ०.५% रक्कम नवप्रवर्तन व उद्योजकता प्रोत्साहनासाठी राखीव ठेवणे बंधनकारक असेल. सर्व योजना महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी मार्फत राबविल्या जातील.

या धोरणात नागरिक, स्टार्टअप्स, शैक्षणिक संस्था, इन्क्युबेटर्स, गुंतवणूकदार व विषयतज्ज्ञांचा सक्रिय सहभाग घेण्यात आला आहे. त्यांच्या अभिप्रायावर आधारित प्रादेशिक इन्क्युबेशन समर्थन, सुलभ प्रोत्साहन प्रक्रिया, डिजिटल साक्षरता व उद्योजकीय कौशल्यविकास यासारख्या बाबी समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

# एसटी महामंडळ 'यात्री ॲप' आणणार

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : चालकांना सन्मानजनक मोबदला आणि प्रवाशांना सुरक्षित प्रवासाची हमी देणारे राज्य शासनाचे अधिकृत 'यात्री ॲप' लवकरच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) मार्फत सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एस. टी. महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित केंद्र व राज्य शासनाच्या प्रवासी वाहतुकीविषयी ॲग्रीगेटेड पॉलिसीच्या (समुच्चयक धोरण) अधीन राहून राज्य शासनाचे 'यात्री ॲप' बनवण्याच्या अंतिम मसुद्यावरील बैठकीत मंत्री सरनाईक बोलत होते. या बैठकीला आमदार प्रवीण दरेकर, परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर व इतर अधिकारी उपस्थित होते.

यात्री ॲप चालविण्यासाठी एसटी महामंडळाची प्रवाशांप्रती असलेली निष्ठा आणि वर्षानुवर्षापासूनची विश्वासार्हता उपयोगी पडणार असून उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण होणार आहे, असेही मंत्री सरनाईक सांगितले.



परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले, मराठी तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, भरमसाठ नफा कमावून प्रवासी व चालकांना वेठीस धरणाऱ्या खासगी कंपन्यांच्या जोखडातून मुक्त करण्याच्या प्रामाणिक हेतूने आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रवासी ॲप बस, रिक्षा, टॅक्सी व ई-बस या वाहन सेवेकरीता सुरू करण्याचे निश्चित केले आहे. हे ॲप परिवहन विभागाच्या सहकार्याने एसटी महामंडळामार्फत सुरू करण्यात येईल. भविष्यात एसटी महामंडळाला उत्पन्नाचा नवा स्त्रोत निर्माण करणे व प्रवाशांना एक विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून देणे हा उद्देश समोर ठेवून हे ॲप एसटी महामंडळाने नियंत्रित करावे, असेही परिवहन मंत्री श्री.सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

'छावा राईड ॲप' नाव देण्याचे सर्वानुमते निश्चित झाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अंतिम मान्यतेने हे ॲप लवकरच कार्यान्वित करण्यात येईल, असेही सरनाईक म्हणाले

# पेन्शनधारकांना लवकरच दिलासा, रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांचे आश्वासन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - देशातील औद्योगिक, सार्वजनिक, सहकारी, खासगी क्षेत्रातील 67 लाख सेवानिवृत्त 'ईपीएस' कर्मचारी पेन्शनधारक आहेत. त्यांना अंत्यत तुटपुंजे केवळ एक हजार रुपये पेन्शन मिळते. मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठीही अपुरे आहे. त्यामुळे सर्व 'ईपीएस' 95 निवृत्तीवेतनधारक आणि त्यांच्या जोडीदारांना मोफत वैद्यकीय सुविधांची तरतूद तसेच या योजनेत समाविष्ट नसलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसह त्यांना नऊ हजार रुपये पेन्शन देण्याची मागणी शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांच्याकडे केली. त्यावर यावर सरकार सकारात्मक असून लवकरच पेन्शनधारकांना दिलासा मिळेल, अशी ग्वाही मांडविया यांनी दिल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.



'ईपीएस' 95 राष्ट्रीय संघर्ष समितीच्या वतीने पेंशनच्या मागणीसाठी जंतरमंतर दिल्ली येथे आंदोलन सुरू आहे. खासदार बारणे यांनी या आंदोलनाला भेट देऊन पाठिंबा दिला. या मागण्यांचा पाठपुरावा करू असे आश्वासन दिले. देशभरातून आलेले पेंशनधारक कर्मचारी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते. या वेळी संघटनेचे अध्यक्ष अशोक राऊत, सहकारी तसेच पिंपरी-चिंचवड शहरातून आलेले अनेक पेंशनधारक कर्मचारी आंदोलनात सक्रिय सहभागी झाले. सर्वसामान्य निवृत्त कर्मचाऱ्यांचे हक्क सुरक्षित राहावेत यासाठी ही लढाई अत्यंत महत्त्वाची असल्याची खासदार बारणे यांनी सांगितले. त्यानंतर खासदार बारणे यांनी मंगळवारी रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांची भेट घेतली.

ईपीएस' 95 नॅशनल मूव्हमेंट कमिटी देशभरात आंदोलने करून हे मुद्दे सक्रियपणे मांडत आहे. या निवृत्तीवेतनधारकांच्या समस्या सोडवण्यासाठी, 2008-2009 मध्ये विश्व समिती, 2013 मध्ये भगतसिंह कोश्यारी समिती आणि 2018 मध्ये उच्चाधिकार संनियंत्रण समिती यासह अनेक समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. असे असतानाही या समित्यांच्या शिफारशींची सरकारने अंमलबजावणी केली नाही. 'ईपीएस' 95 पेन्शनधारकांना सध्या भांडवली तरतुदीचा परतावा न मिळणे, पेन्शनच्या रकमेचे अपुरे मूल्यांकन आणि योग्य मंजुरीशिवाय उच्च निवृत्तीवेतन पर्याय मागे घेणे यासारख्या महत्त्वपूर्ण समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. 55 लाख कोटी रुपयांच्या पुरेशा निधीच्या 'ईपीएस' 95 योजनेसाठी निवृत्तीवेतनधारकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे. बजेटमध्ये आवश्यक तरतुदींसह किमान नऊ हजार रुपये पेन्शन देण्यासाठी कायदा करण्यात यावा. ईपीएफओने जारी केलेले 31 मे 2017 चे अंतरिम सल्लागार पत्र मागे घ्यावे. 23 मार्च 2017 च्या EPFO परिपत्रकानुसार जास्त पेन्शनची तरतूद करावी. सर्व 'ईपीएस' 95 निवृत्तीवेतनधारक आणि त्यांच्या जोडीदारांना मोफत वैद्यकीय सुविधांची तरतूद तसेच या योजनेत समाविष्ट नसलेल्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसह त्यांना नऊ हजार रुपये पेन्शन द्यावे. कोश्यारी समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी अशी मागणी खासदार बारणे यांनी केली. सरकार सकारात्मक असून लवकरच पेन्शनधारकांना दिलासा मिळेल, अशी ग्वाही मांडविया यांनी दिल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

'ईपीएस'धारकांच्या पेन्शनमध्ये वाढ व्हावी यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करत आहे. सभागृहात शून्य तासांतर्गत अनेकदा हा मुद्दा उपस्थित केला आहे. परंतु आजपर्यंत या समस्येचे निराकरण झाले नाही. 16 नोव्हेंबर 1995 पासून लागू करण्यात आलेल्या 'ईपीएस' 95 योजनेने कर्मचारी कुटुंब निवृत्ती वेतन योजना 1971 ची मालमत्ता आणि दायित्वे आत्मसात केली.

ज्यामुळे मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांवर परिणाम झाला. सेवाकाळात ज्यांनी भरीव योगदान दिले होते. त्याला आता दरमहा 1170 रुपये नाममात्र पेन्शन मिळत आहे. हे मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठीही अपुरे आहे.

मध्ये किमान पेन्शन 1,000 रुपये करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर नियमातील बदल आणि एकतर्फी निर्णयांमुळे अपेक्षित वाढ देण्याऐवजी पेन्शनमध्ये आणखी घट झाली आहे.

**श्रीरंग (आप्पा ) बारणे**
**खासदार**

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली, बैठकीच्या अध्यक्षस्थानी प्रशासक शेखर सिंह होते.



यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली व शहरात सुरु असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावाही घेतला. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर,नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत पिंपरी महानगरपालिका कार्यक्षेत्रातील संरक्षित क्षेत्रातील मालमत्तांना सामान्य करातील सवलत देणे, वैद्यकीय विभागासाठी इंटेन्सव्हिस्ट संवर्गातील पदे ११ महिन्याच्या कालावधी करिता कंत्राटी पद्धतीने भरणे, महापालिका रुग्णालयात कार्डीयाक डोल्पर / २ डी युको व थेडमिल टेस्ट सेवा उपलब्ध करून देणे, प्रभाग a मधील जलनि:सारण नलिकांच्या वार्षिक ठेकेदारी पद्धतीने साफसफाई करणे व चोक अप काढणे कामास मुदतवाढ देणे, धर्मवीर संभाजी महाराज पुतळा परिसरात शंभू सृष्टी उभारणे व अनुषांगिक कामे करणे, कॉन्फेरंन्स ट्रेनिंग अर्बन सस्टेनेबल मोबिलिटी नियीजन करणे, इडूळगाव येथे प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिक दुर्लभ घटकांसाठी निवासी गाळे बांधणे व प्रकल्पातील सदनिकांच्या किचन खिडकी, बाल्कनी पेसेज व ओएचडब्युटी वेस्टर्न कमोड बसविणे, २०७ बालवाड्यांमधील विद्यार्थ्यांना सकस आहार पुरवठा करण्यासाठी अन्नामृत फाउंडेशन यांना २ महिन्याची मुदत वाढ देणे, उद्यान व क्रीडा विभागाकडील २०२५-२६ च्या मूळ अंदाज पत्रकात कामांच्या नावांचा समावेश अकारेण तरतूद, वाढ व घट मान्यता घेणे शिफारस करणे, क्रीडा विभागाकडील २०२५-२६ च्या मूळ अंदाज पत्रकामधील तरतुदीमध्ये घट/ वाढ करणे, पिंपरी चौक येथे माता रमाई पुतळा उभारणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणेकामी वास्तुविशारद यांची नेमणूक करणे, मनपा कार्यक्षेत्रात नव्याने विकसित करण्यात आलेले रस्ते दुभाजक व आवश्यक ठिकाणी पोयता माती पसरविणे,निविदेतील शिल्लक कालावधी करिता वाढीव खर्चास मान्यता देणे, अ क्षेत्रीय कार्यलयांतर्गत उद्याने देखभाल करणे, प्रभाग २१ मधील रुग्णालय इमारती मधील स्थापत्य विषयक दुरुस्ती कामे करणे, क्रीडा संकुल येथे उभारलेल्या सी सी टीव्ही यंत्रणेची वार्षिक तत्वावर दुरुस्ती देखभाल करणे, अग्निशमन व माध्यमिक विभागाकरिता अनुक्रमाने ५ व १३ डेटा एन्ट्री ऑपरेटर नियुक्ती करणे, तालेरा रुग्णालयातील विविध कामाकरिता हाय व्हक्युम सेक्शन मशीन खरेदी करणे, अ गटातील वाहनाचे दुरुस्तीकरिता एजन्सीची नेमणूक करणे, भामा आसखेड पाणीपुरवठा जलवाहिनी योजनेला अडथला ठरणारे उच्च दाब पॉल हलविणे, कला खडक व ड क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत येथील रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणारे विद्युत विषयक कामकाज करण्याच्या सुधारित खर्चास मान्यता देणे, मुख्याध्यापक शिक्षण संवाद सत्र कार्यक्रमासाठी भोजन व्यवस्थेच्या खर्चास मान्यता देणे, माध्यमिक विद्यालयातील विविध परीक्षेकामी प्रश्न पत्रिका, उत्तर पत्रिका व आवश्यक स्टेशनरी साहित्य छपाई कामास मान्यता देणे, माध्यमिक विभागाकडील १० वि विद्यार्थ्यांना जागृती बचत गट व गुरु कृपा महिला बचत गटामार्फत शालेय पिशवी (bag ) खरेदीच्या खर्चास मान्यता देणे, २०२४ -२५ च्या आर्थिक विवारणास मान्यता देणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

# पिंपरी-चिंचवडमध्ये नव्या अग्निशमन केंद्रांची उभारणी वेगात

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड शहराचा विस्तार वेगाने होत असताना आपत्कालीन सेवा वेळेवर पोहोचणे गरजेचे ठरत आहे. त्यामुळे महापालिकेच्या अग्निशमन विभागाने शहरातील विविध भागांमध्ये नव्या अग्निशमन केंद्रांची उभारणी तसेच नियोजन सुरू केले असून काही केंद्रांचे काम अंतिम टप्प्यात आहे, तर काहींसाठी जागा निश्चिती व निविदा प्रक्रिया सुरू आहे.**




सध्या एकूण १० अग्निशमन केंद्रे कार्यरत असून त्यामध्ये पिंपरी येथील मुख्य अग्निशमन केंद्र, भोसरी उपअग्निशमन केंद्र, मोशी उपअग्निशमन केंद्र,, चिखली उपअग्निशमन केंद्र, तळवडे उपअग्निशमन केंद्र, रहाटणी उपअग्निशमन केंद्र, थेरगाव उपअग्निशमन केंद्र, प्राधिकरण उपअग्निशमन केंद्र, चोविसावाडी उपअग्निशमन केंद्र, नेहरूनगर उपअग्निशमन केंद्र इत्यादी केंद्रांचा समावेश आहे. या केंद्रांमधून शहराच्या विविध भागांमध्ये २४x७ सेवा देण्यात येते. औद्योगिक आणि निवासी भागांसाठी ही केंद्रे महत्त्वाची ठरत आहेत. पिंपरी चिंचवड शहर झपाट्याने विकसित होत असून त्यानुसार सुरक्षितता उपायांची आवश्यकता अधिक महत्त्वाची ठरते आहे. वाढत्या लोकसंख्येप्रमाणे प्रतिसाद वेळ कमी करणे, शहराच्या प्रत्येक भागात अग्निशमन सेवा पोहोचवणे, मोठ्या औद्योगिक वसाहतींसाठी विशेष सुविधा निर्माण करणे, रहिवासी वस्त्यांमध्ये, नव्या टाउनशिपमध्ये तत्काळ मदत देणे या अनुषंगाने आणखी अग्निशमन केंद्रे बांधण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

सध्या पुनावळे, दिघी, निगडी प्राधिकरण येथील हेडगेवार भवन, पिंपरी येथील अग्निशामक मुख्यालय याठिकाणी सशक्तता वाढवण्यासाठी या अग्निशमन केंद्रांचे बांधकाम सुरु आहे.

एवढेच नव्हे तर महापालिकेने भविष्यात प्रस्तावित केलेली एकूण ३ अग्निशमन केंद्रांकरिता भूसंपादन करण्याचे कार्य प्रस्तावित केले आहे.

त्यामध्ये पिंपळे निलख येथील संरक्षण खात्याचीही जागा उपलब्ध करण्याचा प्रयत्न विभागाकडून सुरु आहे. नगररचना व इ क्षेत्रीय (स्थापत्य) यांचे मार्फत एकत्रित रित्या चऱ्होली, वर्ल्ड प्राईड सिटी परिसरातील अग्निशमन केंद्रां करिता भूसंपादन करून बांधकाम करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. भोसरी येथील एमआयडीसीमधील एफ-२ ब्लॉक येथे क क्षेत्रीय स्थापत्य यांच्यामार्फत अग्निशमन केंद्र बांधकाम विषयक टेंडर प्रक्रिया राबवीण्यात येत आहे.

# पिंपरीतील 13 संघटित टोळ्यांविरोधात ‘मकोका’

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील १३ संघटित गुन्हेगारी टोळ्यांविरोधात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यान्वये (मकोका) कारवाई करण्यात आली आहे. जुलै २०२५ महिन्यात विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल झालेल्या १३ गंभीर गुन्ह्यांमध्ये एकूण ५७ गुन्हेगारांची तुरुंगात रवानगी करण्यात आली आहे.या टोळ्यांनी खून, खुनाचा प्रयत्न, अमली पदार्थविक्री, जबरी चोरी, खंडणी, अपहरण, बलात्कार, घातक शस्त्र बाळगणे, दहशत निर्माण करणे, फसवणूक, बनावट कागदपत्रे वापरणे, घरफोडी, दरोडे, वेश्याव्यवसायास प्रवृत्त करणे, वाहनांची तोडफोड-जाळपोळ यांसारखे गंभीर गुन्हे केले आहेत. त्यांच्यावर एकूण ११४ गुन्ह्यांची नोंद झाली आहे.अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड यांनी आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अंतर्गत मोकाची कारवाई केली आहे.




हिंजवडी, चिंचवड, चिखली, देहूरोड, बावधन, चाकण, सांगवी, दिघी, संत तुकारामनगर, म्हाळुंगे एमआयडीसी, एमआयडीसी भोसरी अशा वेगवेगळ्या ठिकाणी कार्यरत असलेल्या १३ टोळीप्रमुख व त्यांचे ५७ साथीदार यांच्यावर ओळख पटवून तपासाअंती ‘मकोका’अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.हिंजवडीतील आशिष ऊर्फ बोना संतोष सोजवळ (टोळीप्रमुख), चिंचवड हद्दीतील परवेज ऊर्फ सोनू जावेद मणियार, बावधन हद्दीतील जयश्री ऊर्फ कल्याणी उमेश देशपांडे, चिखलीतील आकाश पांडुरंग मोहोळ ऊर्फ आक्या बॉण्ड, देहूरोडमधील चंदू गोरख सकट, चाकणमधील विशाल माणिक राऊत, संत तुकारामनगर येथील जावेद साबीरअली सय्यद,दिघीतील शुभम पंढरीनाथ पोखरकर, म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नारायण सुनील घावटे, सांगवीतील विघ्नेश गुणशिलन रंगम, चिखलीतील अनिरुद्ध ऊर्फ विकी ऊर्फ बाळा राजू जाधव, एमआयडीसी भोसरीतील चेतन रामलाल कुशवाह, शकील खाजा काझी या टोळ्यांवर मकोकाची कारवाई करण्यात आली आहे.

# प्रारूप विकास आराखड्याविरोधात गुरूवारी महामोर्चा!

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

विकास नियोजन विशेष घटक पिंपरी चिंचवड महानगरपालिका उपसंचालक (नगररचना) व मा.आयुक्त,प्रशासन विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी चिंचवड शहराच्या भविष्याला दिशा देणारा प्रारूप सुधारित विकास आराखडा २०२५ हा केवळ कागदावरचा देखावा असून तो शहरातील जनतेच्या भावना, कायदेशीर बाबी आणि विकासाच्या वास्तवाशी पूर्णपणे विसंगत आहे. तब्बल ५०,००० नागरिकांनी हरकती घेतल्या ही त्याची पावती आहे. भूमिपुत्र, शेतकरी, छोटे कारखानदार, गोरगरिब सामान्य नागरिकांच्या अपेक्षा आणि गरजा पूर्ण करण्यास हा आराखडा सपशेल अपयशी ठरल्याचा हा पुरावा आहे. या आराखड्यातील गंभीर त्रुटी, अनियमतता आणि जनविरोधी धोरणांविरोधात आवाज उठविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस



पिंपरी चिंचवड शहर वतीने गुरूवार, दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी महापालिका भवनावर महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्यांना बगल देत, हा आराखडा केवळ जुन्या चुकांची पुनरावृत्ती करत आहे. हा प्रारूप आराखडा केवळ बेकायदेशीरच नाही, तर पारदर्शकतेचा अभाव, आर्थिक अव्यवहार्यता आणि समन्वयाच्या अभावाचे उत्तम उदाहरण आहे. जुन्या आराखड्यातील ८०० हून अधिक आरक्षणे (एकूण १,४३० पैकी ५६%) कोणतीही फेरबदल न करता तशीच ठेवण्यात आली आहेत. विशेषतः, फक्त २०.८% आरक्षित जागांचा विकास झाला असून, १,१०० हून अधिक जागा अविकसित राहिल्या किंवा त्यावर अनधिकृत बांधकामे झाली आहेत. यामुळे आराखड्याची व्यवहार्यता धोक्यात आली असून, सार्वजनिक सुविधा केवळ कागदावरच राहिल्या आहेत. कालबाह्य आरक्षणांमुळे कायदेशीर वाद आणि महापालिकेचा आर्थिक भारसुध्दा वाढला आहे.

या जनविरोधी आराखड्याविरोधात नागरिकांनी मोठ्या संख्येने महामोर्चात सहभागी होऊन आपल्या हक्कांसाठी आणि शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवाज उठवावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर वतीने करण्यात येत आहे. मोर्चा शगुन चौक, पिंपरी येथून पुणे-मुंबई महामार्गाने महापालिका भवनावर धडकणार आहे. मोर्चा गुरुवार दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ रोजी स. १०.३० वा शगुन चौक, पिंपरी येथून पुणे-मुंबई महामार्गाने महापालिका भवनावर धडकणार आहे.

सदर पत्रकार परिषदेस शहराध्यक्ष योगेश बहल, मा.नगरसेवक अजित गव्हाणे, मा.विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, महिला अध्यक्ष कविता आल्हाट, माजी नगरसेवक भाऊसाहेब भोईर, राहुल भोसले, मयूर कलाटे, कार्याध्यक्ष शाम लांडे, फजल शेख, पंकज भालेकर,प्रभाकर वाघेरे, माजी नगरसेवक प्रशांत शितोळे , माजी नगरसेविका माया बारणे, प्रकाश सोमवंशी, सतीश दरेकर,जगन्नाथ साबळे, मायाला खत्री,संजय उदावंत, रवींद्र ओव्हाळ, अक्षय माच्छरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# पिंपळे सौदागर परिसरात ग्रेड सेपरेटरची गरज - शत्रुघ्न काटे

>>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपळे सौदागर येथील पि.के. चौक परिसर सध्या प्रचंड वाहतूक कोंडी, अव्यवस्थित सिग्नलिंग आणि सतत घडणाऱ्या अपघातांच्या घटना यामुळे नागरिकांसाठी अत्यंत धोकादायक बनला आहे. या गंभीर समस्येच्या पार्श्वभूमीवर पिंपरी- चिंचवड भाजपचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांनी या ठिकाणी थेट पाहणी दौरा केला.



पिंपळे सौदागर येथील पि.के. चौक हा शहरातील एक अत्यंत महत्त्वाचा आणि दैनंदिन वाहतुकीच्या दृष्टीने व्यस्त ठिकाण आहे. या ठिकाणी सकाळी आणि सायंकाळी कामावर जाणाऱ्या व परत येणाऱ्या नागरिकांमुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होते, तसेच हलक्या व जड वाहनांच्या संमिश्र प्रवाहामुळे अपघातांचे प्रमाणही वाढत आहे.

या पार्श्वभूमीवर भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांनी पि.के. चौक परिसराची सविस्तर पाहणी केली. त्यांनी स्थानिक नागरिक,व्यावसायिक आणि वाहतूक विभागाशी संवाद साधत प्रत्येक अडचणी समजून घेतल्या.

शत्रुघ्न काटे यांनी स्पष्टपणे सांगितले की, पि.के. चौक परिसर हा संपूर्ण पिंपळे सौदागर,रहाटणी या भागांना जोडणारा मुख्य जंक्शन आहे. येथे शाळा,कार्यालये, सोसायट्या, हॉटेल्स, औद्योगिक वाहतूक यामुळे दिवसभर वाहतूक ताण असतो.

त्यामुळे अनेक वेळा अपघात घडत आहेत आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे." या भागात केवळ सिग्नल, झेब्रा क्रॉसिंग वा सामान्य सुधारणा पुरेशी ठरणार नाही. भविष्यातील वाढती लोकसंख्या आणि वाढती वाहतूक लक्षात घेता येथे ग्रेड सेपरेटर (उड्डाणपूल अथवा अंडरपास) उभारणे अत्यंत आवश्यक आहे.या उपायामुळे वाहतुकीचा सहज प्रवाह होईल आणि अपघात टळतील.

यासंदर्भात ते लवकरच महानगरपालिका आयुक्त, वाहतूक विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि नगर रचना विभागाशी बैठक घेणार असून,ग्रेड सेपरेटरसाठी लागणाऱ्या निधी आणि तांत्रिक बाबींसंदर्भात प्रस्ताव तयार केला जाईल,असेही त्यांनी सांगितले.

पि.के.चौकात ट्रॅफिकची झपाट्याने वाढ,अपघात व नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न,शाळा,हॉस्पिटल,वसाहती च्या दृष्टीने महत्त्वाचा मार्ग आणि यासाठी दीर्घकालीन उपाय म्हणून ग्रेड सेपरेटर आवश्यक आहे.

या भागातील नागरिकांनीही शत्रुघ्न काटे यांच्याकडे यासंदर्भात अनेक वेळा निवेदन दिले होते. या पाहणीवेळी इन्फ्राकिंग कंन्सल्टन्ट श्री पतंगे साहेब, आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 96574 09579

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

बुधवार दिनांक 06/08/2025

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# लोणावळा नगरपरिषदेच्या गलथान कारभारावर

## आ. सुनील शेळके यांचा थेट हल्लाबोल!



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मावळ : गेल्या कित्येक महिन्यांपासून लोणावळा शहरातील मूलभूत प्रश्न प्रलंबित असून नागरिक त्रस्त आहेत. मात्र तरीही नगरपरिषद प्रशासनाचे काम संथ, निष्क्रिय व निष्काळजीपणाचे असल्याची तीव्र शब्दात खरमरीत टीका आमदार सुनील शेळके यांनी येथे केली. आमदार शेळके यांच्या उपस्थितीत लोणावळा नगरपरिषदेच्या दालनात घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत विविध विषयांवर खोलवर चर्चा झाली आणि प्रशासनाच्या झोपेचे ढोल वाजवले.

"भूसंपादनाचे नाव घेऊन उड्डाणपुलाचे काम थांबलेले का?"

भांगरवाडी उड्डाणपुलाचे काम सुरुवात होऊनही भूसंपादनाच्या प्रक्रियेत गोंधळ सुरूच आहे. हे काम पूर्ण व्हावे यासाठी प्रशासन गंभीरपणे काम करायला हवे, अशी आक्रमक भूमिका शेळके यांनी घेतली.

"सीसीटीव्हीचा DPRच नाही – मग सुरक्षितता कुठे?"

संपूर्ण शहरात सीसीटीव्ही बसवण्याची योजना अजूनही कागदावरच असून DPR तयार करण्यासाठी अद्याप हालचाल नाही. यावर तीव्र नाराजी व्यक्त करत आमदार शेळके यांनी अधिकाऱ्यांना याबाबत स्पष्ट सूचना दिल्या.

"शालेय विद्यार्थ्यांचे भवितव्य अडवणारे 'राजकारण' अत्यंत निंदनीय!"

खंडाळा येथील विद्यार्थ्यांसाठी नवीन शाळेच्या जागेबाबत बैठकांमध्ये सहमती मिळूनही स्थानिक काही व्यक्ती राजकारणासाठी भूसंपादनात अडथळा निर्माण करत असल्याचे आमदार शेळके यांनी स्पष्टपणे सांगितले.

"विद्यार्थ्यांचे नुकसान होणे ही क्षम्य बाब नाही. हा प्रकार समाजविघातक आहे," असा ठपका त्यांनी ठेवला.

"नगरपरिषद प्रशासन ढिसाळ; आता जिल्हाधिकाऱ्यांना थेट जाब विचारणार!"

लोणावळा नगरपरिषदेचा संपूर्ण कारभार ढिसाळ, निष्क्रिय व लोकहितशून्य असल्याचा आरोप करत आमदार शेळके यांनी घोषणा केली की,

१. "दि. १ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनाबाहेर किंवा मोकळ्या मैदानात सभा घेऊन शहरातील कामांचा लेखाजोखा विचारला जाईल."

२. शहरात चोऱ्या, गुटखा, ड्रग्ज आणि अवैध धंद्यांची वाढ चिंतेची बाब असून पोलीस प्रशासनाने गस्त वाढवावी व कारवाईत तत्परता दाखवावी, अशा शब्दांत त्यांनी सूचनाही दिल्या.

३. शहरात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ४० नवीन व १० जुन्या ट्रॅफिक वॉर्डन्सची नियुक्ती लवकरच होणार असून, त्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु असल्याचे सांगण्यात आले.

या बैठकीला उपविभागीय अधिकारी सुरेंद्र नवले, तहसिलदार विक्रम देशमुख, पोलीस निरीक्षक राहुल लाड, नगरपरिषद मुख्याधिकारी अशोक साबळे यांच्यासह विविध पक्षांचे स्थानिक नेते, नागरिक आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकांच्या प्रश्नांवर कोणतीही तडजोड होणार नाही. प्रशासन योग्य काम करत नसेल, तर त्यांना जागं करण्यासाठी रस्त्यावर उतरण्याचा इशारा आम्ही दिलाच आहे!"

– आमदार सुनील शेळके

# महाविकास आघाडी वतीने पवनामाईचे पूजन!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहरातील पवना नदी या नदीला शहरवासीय पवना माई म्हणून संबोधतात दरवर्षी पवनामाईचे पूजन केले जाते यावर्षी पिंपरी चिंचवड महाविकास आघाडी वतीने पवना माईचे पूजन करण्यात आले.यावेळी माजी नगरसेविका तथा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस प्रियंका बारसे, राष्ट्रवादी पक्षाच्या शहराध्यक्ष ज्योतीताई निंबाळकर, शिवसेनेच्या भोसरी विधानसभा मतदारसंघातील नेत्या रूपालीताई अल्हाट प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी आपल्या प्रतिक्रिया देताना माजी नगरसेविका प्रियंका ताई बारसे यांनी सांगितले की खरंतर यावर्षी लवकरच पावसाला सुरुवात झाली व आता ऑगस्टमध्ये 90% धरण भरलेले आहे पण तरीही पिंपरी चिंचवड करांना पाण्यापासून वंचित ठेवले जात आहे.धरण उशाला कोरड घशाला अशी अवस्था झाली असं म्हटलं तरी वावगे नाही .आज पूजन करून सत्ताधारी तसेच पिंपरी चिंचवडचे मा. आयुक्त यांना आम्ही आवाहन करत आहोत की लवकरात लवकर त्यांनी दिवसाआड पाणीपुरवठा बंद करून रोजचे रोज नियमित पाणी नागरिकांना मिळेल अशी व्यवस्था करावी.अन्यथा तीव्र आंदोलन करून आमच्या हक्कासाठी आम्हाला लढावे लागेल.

पाण्याअभावी महिलांचे रखडलेली कामे ,कामगार वर्ग, तसेच दिवस दिवस एमएसईबीचि लाईट नसेल तर दिवसाआड मिळणार पाणी चार दिवसावर जाते .यात टँकर माफियांचा फायदा होतो कारण याकाळात टँकरची मागणी वाढते. यामुळेच पाणी आमच्या हक्काचे नाही कुणाच्या बापाचे अशा



घोषणा देत आम्ही हे आंदोलन जागे ठेवणार आहोत.मनपा आयुक्तांना भेटून याबाबतचे निवेदन त्यांना देणार आहोत.आणि तरीही यावर विचार केला गेला नाही तर तीव्र आंदोलन पिंपरी चिंचवड शहरात छेडण्यात येणार आहे तसेच दररोज नियमित पाणी पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना मिळेल अशी व्यवस्था करावी सध्या दिवस आड पाणीपुरवठा सुरू आहे तो बंद करावा व दररोज नियमित पाणीपुरवठा करावा अन्यथा तीव्र आंदोलन करून आमच्या हक्कासाठी आम्हाला लढावे लागेल असे निवेदन देण्यात येणार असल्याचे प्रियंका ताई बारसे यांनी सांगितले.

तसेच लवकरात लवकर आपली मागणी मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराही प्रियंका ताई बारसे यांनी दिला आहे.

यावेळी सोनाली पासलकर, जयमाला कदम, तायरा सय्यद , पुष्पा गोपाळे, कान्होपात्रा थोरात, अर्चना बारकुल,गौरी घंटे,कमल धाईंजे रेखाताई, सुशिला पवार, कल्पना घाडगे, विनोद धुमाळे,सचिन निंबाळकर व इतर पक्षाचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968